**"दैनिक सकाळ" मध्ये दि. १३-५-१९९३ रोजी प्रसिद्ध झालेला लेख**

# पूर्वपुण्याईची शाळा : 'स्व'-रूपवर्धिनी

**प्रा. राम डिंबळे, पुणे**

*मा. मुख्याध्यापक यांसी,*

*सादर नमस्कार*

*फार वर्षांपूर्वी मी आपल्या शाळेतून एस. एस. सी. झालो. आज मी तैवानमध्ये यूनोच्या आंतरराष्ट्रीय शेती संशोधन संस्थेत उच्चपदावरील कृषी शास्त्रज्ञ आहे. आज मी सर्वार्थाने संपन्न आहे. अत्यंत अवघड परिस्थितीत ज्यांनी रोप सुकू दिले नाही, मरू दिले नाही त्यांनाच पिकाचे श्रेय जाते असे शेतीशास्त्र सांगते.*

*माझ्या सार्थ आयुष्याचे श्रेय आपल्या शाळेतील शिक्षक श्री. कृ. ल. पटवर्धन यांना जाते. तीव्र दुष्काळी गावातून पुण्यातील नातेवाईकांकडे आश्रित म्हणून राहायला येऊन मी शिकू पाहात होतो; पण दुष्काळाने सर्व मार्ग खुंटले. ऐन एस. एस. सी. ला मी शिक्षण सोडायला निघालो; पण पटवर्धन सरांनी सर्वार्थाने आधार दिला, आग्रह धरला, मागे सरू दिले नाही, म्हणूनच मी आज या पदाला पोहोचलो.*

*कृतज्ञतेपोटी मी आपल्या शाळेत पटवर्धन सरांच्या नावाने आदर्श शिक्षक पारितोषिक देण्यासाठी भरीव रक्कम ठेवू इच्छितो. मला सरांचा पत्ता माहीत नाही, कृपया आपणच त्यांची संमती घ्यावी.*

आपला,

**डॉ. नारायण सखाराम तळेकर**

पूर्व पुण्यातील एका शाळेला माजी विद्यार्थ्याचे असे हे पत्र आले त्या वेळी पटवर्धन सर शाळेतून निवृत्त होऊन नव्या दमाने पूर्व पुण्यात अशीच कोमेजणारी शाळकरी रोपटी जगविण्यासाठी 'स्व'-रूपवर्धिनी नावाची शिक्षणसंस्था वाढविण्यात मग्न होते. जुन्या शाळेला पटवर्धनांचे हे असले 'शाळाबाह्य' खटाटोप कधीच मंजूर नव्हते. त्यामुळे डॉ. तळेकरांचा प्रस्ताव तसाच फायलीत दवून राहिला असता. पण नियतीला हे मंजूर नव्हते. योगायोगाने त्यावेळेस पटवर्धनांचा तळेकरांशी पत्रव्यवहार झाला आणि डॉ. नारायण सखाराम तळेकर यांनी - एका कृतज्ञ दुष्काळी शाळकऱ्याने - पटवर्धनांच्या 'स्व'-रूपवर्धिनीला १,१२,००० रुपये गुरुदक्षिणा दिली.

आज मंगळवार पेठेत, नागझरीच्या काठी अशातूनच 'स्व'-रूपवर्धिनी नावाचे शैक्षणिक तीर्थक्षेत्र आकाराला आलेले दिसते. गुरुवार ता. १३ मे ९३ ला या वास्तूच्या पूर्ततेचा समारंभ अण्णासाहेब हजारे यांच्या उपस्थितीत होत आहे. विषम परिस्थितीशी झटपट करणारी किशाभाऊंची पटवर्धिनी कितीतरी जुनी आहे. फक्त ७९ मध्ये या धडपडीला 'स्व'-रूपवर्धिनी हे नाव मिळाले आणि आज हा उत्तुंग आकार! शाळा संस्थांनी तुडुंब भरलेल्या या पुण्याला आपण विद्येचे माहेरघर म्हणतो; पण येथे कोणत्या शिक्षणाची सोय आहे? असे विचारता कोत्या ग्रांथिक शिक्षणाचीच विद्यापीठ गिरणी सर्वत्र चालू दिसते! डॉ. तळेकरांसारखे हृदय जागृत करणारे शिक्षण किती जणांना लाभते? विद्येच्या माहेरघराचे पूर्व पुणे आणि पश्चिम पुणे असे दोन भाग आहेत. त्यातील पूर्व पुणे हे बहुतांशी विद्येचे बाहेर घर वाटावे असे वंचित आहे. तिथे ग्रांथिक शिक्षणाचीही परवड आहे, तर काळजाला हात घालणाऱ्या संस्कारांचे नावच नको!

अशा पूर्व पुण्यात 'स्व'-रूपवर्धिनीची चौदा वर्षांपूर्वी स्थापना झाली ती ही कमतरता भरून काढण्यासाठीच, सर्वत्र शाळा, म्हणजे वर्गखोल्या असूनही मुलांमध्ये व्यावहारिक अडचणींवर मात करून शिकण्याची जिद्द असल्याचे दिसते. झोपडपट्ट्या, जुने वाडे अशा ठिकाणी जेमतेम एका अर्ध्या खोलीत जीवन कंठणाऱ्या कष्टकरी अथवा नोकरदार कुटुंबातील मुले शाळेत येतात, इयत्ता ओलांडून पुढेही सरकतात, पण ते शिक्षण काय दर्जाचे

असते?

किशाभाऊ पटवर्धन आणि त्यांचे सहकारी आपली एक स्वतंत्र शाळा न काढता सर्व शाळांची एक सहशाळा काढण्याच्या खटाटोपाला लागले. या सहशाळेला त्यांनी 'स्व'-रूपवर्धिनी नाव दिले तेही जाणीवपूर्वक. स्वामी विवेकानंदांनी म्हटल्या-प्रमाणे 'मानवातली मूळ पूर्णता उलगडते शिक्षणी' हेच शिक्षणाचे सूत्र या नावातून व्यक्त होते. पटवर्धन त्यांच्या निवृत्तीनंतर अनेक वर्षे पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनीचे कार्यकर्ते होते. समाजाच्या सर्व अठरापगड थरात बुद्धिमत्ता व गुणवत्ता आहे; पण तिचे चीज करण्याची सोय मात्र थोड्याच ठिकाणी आहे. हा प्रबोधिनी मधील निष्कर्ष ध्यानी घेऊन त्यांनी या कामाला सुरुवात केली.

किशाभाऊंनी या मुलांना परिस्थितीवर मात करायला शिकवले. 'विपत्तीमाजीच विकासबीज' हे साने गुरुजींचे सूत्र अवलंबून सतत फुलत राहाणारी मुले येथे दिसू लागली. कुणाच्या दारुड्या वडिलांनी मॅट्रिकच्या मुलांची पुस्तके विकून दारू प्यावी अन याही परिस्थितीत यशस्वी होईन, अशी विकासाची नशा त्या मुलाला चढावी असे दृश्य येथे पाहायला मिळू लागले.

इंग्रजी-गणितासारखे शाळकरी राहू-केतू मुलांच्या पत्रिकेत वक्री राहाणार नाहीत याची तज्ज्ञ शिक्षकांकरवी पूर्ण दक्षता घेतली. वर्षातले ३६५ दिवस अखंड चालणारी जणू ज्ञानपोई वर्धिनीत घातली.



सुरुवातीला महापालिकेच्या रिकाम्या शाळागृहात रोज सायंकाळी चालणारे हे ज्ञानसत्र खूप अडचणीतून निभावून न्यावे लागले. "मी बाणा स्वातंत्र्याचा चालवू कुणाच्या बळे" असे वाटू लागले, तेव्हा संस्थेला स्वतःची वास्तू हवी असे ठरवण्यात आले. मंगळवारातल्या ऐन झोपडपट्टीतील नाल्याकाठी एक प्लॉट मिळवला.

या प्लॉटवर दोन टप्प्यांत आजची पूर्ण वास्तू उभी करण्यासाठी किशाभाऊंनी अक्षरशः रक्त आटवले. एकूण सुमारे ३५ लाख रुपये समाजात हिंडून त्यांनी मिळवले. समाजातील गरजू मुलांसाठी देणगी हक्काने मागता आली पाहिजे, असा निखळ जिह्वाळ्याचा मित्रपरिवार किशाभाऊंनी जोडला. ज्या वेगाने बांधकाम उभे राहील त्या वेगाने देणग्या मिळवून आणण्याचा एकहाती विक्रम किशाभाऊंनी केला. याच वेळात रोजचे वर्ग क्रीडादले, ग्रंथालय, अभ्यासिका, शिबिरे आणि अनेक उपक्रम वाढत्या प्रमाणात राबवणारे निरपेक्ष कार्यकर्ते किशाभाऊंनी जोडले. पुढे पुढे वर्धिनीचे विद्यार्थीच कार्यकर्ते म्हणून उभे राहिले. या तरुण मुलांनी स्वतःहून पुण्याच्या गरजू विभागात वर्धिनीच्या शाखा काढल्या.

येथल्या एकेका मुलाच्या धडपडीची जयगाथा मोठ्या कौतुकाने सांगताना किशाभाऊंचे डोळे आनंदाश्रूंनी लकाकतात. लाखो रुपयांच्या देणग्या मिळवून आजची भव्य वास्तू बांधली. यापेक्षाही मोठ्या मोलाची ही कामगिरी करता आली याचे सार्थक त्यांच्या चेहऱ्यावर दिसते. चांगल्या कामाला कधीच पैसा कमी पडत नाही, असे ते सहज म्हणतात.

सर्वच महानगरांना झोपडपट्ट्यांचा वेढा पडला आहे. या झोपडपट्ट्या-वस्त्या, व्यसने व गुन्हेगारीची विद्यालये झाली आहेत. तिथली मुले उत्तम यशस्वी होऊ शकतात. शिकून जबाबदार होऊ शकतात हे 'स्व'-रूपवर्धिनीने दाखवून दिले आहे. आज या कामाची गरज एवढी मोठी आहे की एका शहरातल्या एका 'स्व'-रूपवर्धिनीने काय होणार? हे काम वाढले पाहिजे, सार्वत्रिक झाले पाहिजे तूर्त तरी.